सहायक मर्यादित (विभागीय) स्पर्धा परीक्षा - 2014
पेपर - 1

# A

**2014**

CODE : **LO5**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.**

**प्रश्नपुस्तिका**

**मराठी व प्रशासनिक लेखन**

**वेळ : $2\frac{1}{2}$ ( अडीच ) तास**

**एकूण प्रश्न : 150**
**एकूण गुण : 300**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**
**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. Survey साठी मराठी पर्याय :

(1) भूमापन (2) सर्वेक्षण (3) पाहणी (4) वरील सर्व

---

2. 'समाशोधन' साठी इंग्रजी पारिभाषिक शब्द :

(1) Bond (2) Clearing (3) Arrears (4) Bill

---

3. 'गतं न शोच्यम्।' या आशयाची इंग्रजीतील म्हण निवडा :

(1) Might is right

(2) It is no use crying over spilt milk

(3) Doctor after death

(4) Money makes more go

---

4. 'Ominous' या शब्दाचा अर्थ सांगा.

(1) चांगला (2) सगुण (3) अभद्र (4) उत्तम

---

5. 'दूरप्रक्षेपक' या पारिभाषिक संज्ञेसाठी खालीलपैकी योग्य पर्याय सांगा.

(1) Mobile Transmitter (2) Mobile Internet

(3) Mobile (4) Modem

---

6. 'Round' हा इंग्रजी शब्द क्रियाविशेषण म्हणून खालीलपैकी कोणत्या वाक्यात वापरला आहे ?

(1) A square peg in a round hole

(2) The evening was a round of pleasures

(3) We shall round the cape in safety

(4) He came round to their belief

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

7. 'The wolf calls for satisfaction before God' या म्हणीसाठी योग्य पर्याय सांगा.

(1) शिंक्याचे तुटले, बोक्याचे पटले.
(2) दात कोरुन पोट भरत नसते.
(3) आधी पोटोबा मग विठोबा.
(4) आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना.

---

8. 'पोटात शिरणे' या वाक्प्रकाराचा इंग्रजी अर्थ कोणता ?

(1) To yearn
(2) To creep into one's favour
(3) To pinch the belly
(4) To take away one's livelihood

---

9. खालील प्रश्नार्थक इंग्रजी वाक्यांपैकी विसंगत वाक्य ओळखा.

(a) Do you no the time ?
(b) Do you have the time ?
(c) Have you got the time ?
(d) What time is it now ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) (b) आणि (c) (4) फक्त (d)

---

10. 'Chronology' या क्रमवाचक शब्दासाठी योग्य पर्याय सांगा :

(1) स्थळ क्रम (2) काळ-स्थळ विसंगती (3) कालविसंगती (4) कालानुक्रम

---

11. चुकीचा अर्थ असलेली जोडी ओळखा :

(1) Conduct - आयोजन
(2) Organize - तयारी करणे
(3) Prepare - तयार होणे
(4) Attain - उपस्थित असणे

---

12. Transcription साठी मराठी पारिभाषिक शब्द :

(1) प्रतिलेखन (2) नक्कल (3) पर्याय क्र. (1) आणि (2) (4) अनुवाद

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

13. 'वरातीमागून घोडे' या म्हणीसाठी योग्य पर्याय शोधा.

(1) Casting pearls before swine

(2) Do not look a gift horse in the mouth

(3) A figure among ciphers

(4) A day after the fair

---

14. 'Conjunction' या व्याकरणिक संज्ञेसाठी योग्य पर्याय निवडा :

(1) केवलप्रयोगी अव्यय (2) उभयान्वयी अव्यय

(3) शब्दयोगी अव्यय (4) क्रियाविशेषण

---

15. 'He studied English' या वाक्याचे मराठीतील वर्तमानकाळाचे रूप ओळखा.

(1) तो इंग्रजीमध्ये अभ्यास करतो. (2) तो इंग्रजांकडून इंग्रजी शिकतो.

(3) तो इंग्रजीचा अभ्यास करत होता. (4) तो इंग्रजीचा अभ्यास करतो.

---

16. 'To draw the long bow' या म्हणीचा मराठीतील अचूक अर्थ ओळखा.

(1) अति बोलणे (2) बडबड करणे

(3) तिखटमीठ लावून सांगणे (4) बाष्फळ चर्चा करणे

---

17. 'परिश्रम हीच खरी संपत्ती' या विधानाशी साधर्म्य दाखविणारे इंग्रजी वाक्य ओळखा :

(1) Hard work is great treasure

(2) Hard work makes a nation strong

(3) Perseverance is a real treasure

(4) Hard work makes man great

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**18.** विसंगत जोडी कोणती ?

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | जो मुलगा व्यायाम करतो, तो सशक्त होतो. | (i) | प्रश्नार्थक विशेषण |
| (b) | कोण मनुष्य येऊन गेला ? त्याने काय पदार्थ आणले ? | (ii) | संबंधी विशेषण |
| (c) | आम्हा मुलांना कोण विचारतो ? | (iii) | सार्वनामिक विशेषण |
| (d) | श्रीमंतांना गर्व असतो. | (iv) | दर्शक विशेषण |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) – (ii)  (2) (b) – (i)  (3) (c) – (iii)  (4) (d) – (iv)

---

**19.** 'Classical Language' या भाषिक संज्ञेसाठी योग्य पर्याय सांगा :

(1) अभिजात भाषा  (2) मृत भाषा  (3) लोकप्रिय भाषा  (4) संगीताची भाषा

---

**20.** 'वृत्तपत्र खप तपासणी संस्था' यासाठी खालीलपैकी योग्य पर्याय कोणता ?

(1) Auditory Board of Circulation  (2) Audit Broadcasting Centre

(3) Audit Bureau of Circulation  (4) Analytical Bureau of Crisis

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**खालील उतारा वाचून प्रश्न क्रमांक 21 ते 25 यांची योग्य ती पर्यायी उत्तरे लिहा.**

अनेक प्रसंगांची चतुराईची मांडणी किंवा गुंफण म्हणजे ललितकथा होय. गुंफण म्हणजे केवळ 'अनुक्रम' नव्हे. त्यात केवळ कालक्रमाचा संबंध नसून कार्यकारणसंबंध उघड व्हावा लागतो. लघुकथा विस्ताराने लहान असते व एकसरी असते. म्हणून ती लिहिण्याच्या बाबतीत कदाचित संविधानकाचा संपूर्ण साचा लेखकाला प्रारंभी तयार ठेवता येईल. ललितकथा म्हणजे कोठल्याही प्रश्नावरचे पांडित्यपूर्ण प्रवचन नसून एकाहून एक चमत्कृतिपूर्ण व एकमेकांशी कार्यकारणसंबंधाने जडविलेल्या अनेक प्रसंगांची चेतोहारी मालिका होय. संग्राम हा ललितकथेचा आत्मा होय. दोन किंवा अधिक विरोधी शक्ती एकमेकींवर आदळून वर्चस्वासाठी झगडू लागल्या की संग्राम उत्पन्न होतो. या संग्रामामुळेच वाचकांचे मनोरंजन होते. एकाच व्यक्तीच्या मनाची द्विधा स्थिती होऊन हे करू की ते करू असा झगडा तिच्या मनातल्या मनात जेव्हा चालतो तेव्हा मानसिक स्वरूपात संग्राम सुरू असतो. उदा - शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकात हॅम्लेटला विरोध करणारी व्यक्ती पहावी तर दिसत नाही. त्याची आई त्याचे काही बेत हाणून पाडते असे नाही. त्याच्या प्रीतीतली ऑफिलिया त्याला विरोध करते असेही नाही. इतकेच नव्हे तर त्याचा चुलता नाटकाच्या परिभाषेप्रमाणे खलपुरुष ठरत असला तरी तोही त्याच्याशी झगडतो असे नाही. आपल्या बापाच्या नाहक वधाबद्दल सूड घ्यावयाचा हे हॅम्लेटचे 'प्राप्य'; परंतु ते साधण्याच्या कामी व्यक्तींनी किंवा परिस्थितीने विघ्ने आणण्याऐवजी त्याचा तोच शंकाकुशंकांची विघ्ने उभी करीत सुटतो. अर्थात् हॅम्लेट नाटकात जी मनोवेधक युद्धकथा आहे ती व्यक्ती-व्यक्तींतील किंवा व्यक्ति परिस्थितीतील युद्धाची नसून एकाच व्यक्तीच्या दोन मनात सुरू झालेल्या लढ्याची आहे. सारांश संग्रामतत्वाला अनेक तऱ्हांची स्वरूपे प्रत्यक्ष संसारात प्राप्त होत असतात व ललितकथा लेखकाने आपल्या आवडीप्रमाणे व सोयीप्रमाणे त्यापैकी कोणतेही निवडले तरी हरकत नाही.

---

**21.** प्रस्तुत उताऱ्याचे मूळ सूत्र __________ आहे.

(1) लघुकथा (2) ललित कथेचा आत्मा (3) संग्राम (4) हॅम्लेटचे द्वंद्व

---

**22.** हॅम्लेटचा खरा शत्रू __________ होता.

(1) आई (2) ऑफिलिया (3) सूडभाव (4) मनातील द्वंद्व

---

**23.** ललितकथेच्या रचनेमध्ये __________ महत्वाचा असतो.

(1) कालक्रम (2) अनुक्रम (3) कार्यकारणभाव (4) घटनाक्रम

---

**24.** 'संग्रामचा' अर्थ __________.

(1) द्वंद्व (2) युद्ध (3) लढाई (4) शत्रुत्व

---

**25.** संविधानक म्हणजे __________ .

(1) संहिता (2) घटना (3) कथानक (4) विचार

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**Read the following passage carefully and answer the questions given (26 - 30) below it.**

Great comic art is never otherwordly, it does not seek to mystify us, and it does not deny ambiguity by branding as evil whatever differs from good. Great comic artists assume that truth may bear all lights, and thus they seek to accentuate contradictions in social action not gloss over or transcend them by appeals to extrasocial symbols of divine ends, cosmic purpose, or laws of nature. The moment of transcendence in great comic art is a social moment, born out of the conviction that we are human, even though we try to be gods. The comic community to which artists address themselves is a community of reasoning, loving, joyful, compassionate beings, who are willing to assume the human risks of acting rationally. Without invoking gods or demons, great comic art arouses courage in reason, courage which grows out of trust in what human beings can do as humans.

---

26. It can be inferred from the passage that the author admires great comic artists primarily for their __________.

    (a) ability to understand the frequently subtle differences between good and evil.

    (b) ability to reconcile the contradictions in human behaviour.

    (c) insistence on confronting the truth about the human conditions.

    (d) ability to distinguish between rational and irrational behaviour.

    **Answer options :**

    (1) (a) and (d) only (2) (a) and (b) only (3) (c) only (4) (d) only

---

27. Identify the most accurate description of the organization of the passage.

    (a) a sequence of observations leading to prediction.

    (b) a succession of ideas moving from specific to general.

    (c) a series of assertions related to one general subject.

    (d) a statement of major idea, followed by specific examples.

    **Answer options :**

    (1) (a) and (c) only (2) (b) and (c) only (3) (a) and (d) only (4) (c) only

---

कच्च्या कामासाठी जागा

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

28. Identify the word which is opposite in meaning of the word *'ambiguity'* from the passage.

(a) obscurity (b) clarity (c) diplomacy (d) authenticity

**Answer options :**

(1) (a) and (c) only (2) (b) and (d) only (3) (d) only (4) (b) only

---

29. The word *'compassionate'* in the context means ________ .

(a) sensitive (b) complaisant (c) skillful (d) competitive

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) and (c) only

(3) (d) only (4) (a), (c) and (d) only

---

30. The passage suggests that great comic art can be characterised as optimistic about the ability of humans to ________.

(a) rid themselves of pride.

(b) transcend the human conditions.

(c) differentiate clearly between good and evil.

(d) act rationally.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (d) only (3) (c) and (d) only (4) (d) only

---

31. खालीलपैकी कोणते विधान **असत्य** आहे ते ओळखा ?

(a) टिप्पणी लिहिताना उजव्या बाजूला ज्या पत्रावर कार्यवाही करण्यासाठी टिप्पणी लिहिली त्या पत्रावरील नोंदणी शाखेतील आवक क्रमांक लिहावा.

(b) टिप्पणी लिहिताना 1/2 समास सोडावा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b) (2) (a), (b) दोन्हीही (3) (a) (4) (a), (b) दोन्ही नाहीत

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

32. विभागातील प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी सचिवांनी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मंत्रालयात बैठक घेतली. या बैठकीसाठी झालेल्या चहापानाचा व इतर स्टेशनरी खर्चास मंजूरी देण्यासाठीच्या आदेशासाठी पत्रव्यवहाराचा कोणता नमुना वापराल ?

(1) शासन निर्णय (2) परिपत्रक (3) अधिसूचना (4) ज्ञापन

---

33. एखादी फाईल, पूर्वीची कागदपत्रे म्हणून प्रस्तुत करण्यापूर्वी त्यामधील खालील बाबी काढल्या पाहिजेत :

(a) वर्णक्रमी चिठ्ठ्या

(b) पताका

(c) निर्देश पत्र

(d) पृथक पत्र

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) (c) व (d) (3) फक्त (a) (4) फक्त (b)

---

34. देशाच्या संविधानात शासनाची उद्दिष्टे व कार्ये जी सांगितली आहेत ती पार पाडण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कामे घटनेच्या कोणत्या परिशिष्टात नमूद केली आहेत ?

(1) पहिल्या (2) तिसऱ्या (3) पाचव्या (4) सातव्या

---

35. कार्यासन अधिकारी पद्धतीत ________ संदर्भाबाबत कार्यासन अधिकाऱ्यांनी अंतिम आदेश काढावेत असे ठरविण्यात आले.

(1) 100% (2) 80% (3) 70% (4) 50%

---

36. सामान्यत: अनौपचारिक संदर्भ ________ स्तरावर पाठवावा.

(1) कार्यासन अधिकारी (2) सहसचिव (3) उपसचिव (4) सचिव

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

37. कंपनी कायदा अन्वये स्थापन केलेल्या शासकीय महामंडळाशी पत्रव्यवहार करताना तो कोणास अग्रेषित करण्यात येतो ?

(1) कंपनी सचिव (2) महामंडळाचे अध्यक्ष

(3) महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक (4) महामंडळाचे लेखापाल

---

38. सार्वजनिक महत्वाच्या व निकडीच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी विधानमंडळ सदस्याने :

(1) सात दिवस अगोदर सूचना द्यावी लागते. (2) चौदा दिवस अगोदर सूचना द्यावी लागते.

(3) तीस दिवस अगोदर सूचना द्यावी लागते. (4) तीन दिवस अगोदर सूचना द्यावी लागते.

---

39. प्रशासकीय कामकाजामध्ये *'कायदा'* या शब्दाचा खालीलपैकी कोणत्या अर्थी वापर करण्यात येतो ?

(a) ॲक्ट (b) लॉ

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय (a) बरोबर आहे (2) पर्याय (b) बरोबर आहे

(3) दोन्ही पर्याय चूक आहेत (4) दोन्ही पर्याय बरोबर आहेत

---

40. (a) परिपत्रक केवळ मंत्रालयातून काढण्यात येतात.

(b) ज्ञापन संचालकांच्या स्तरावरूनही काढले जाते.

वरीलपैकी **सत्य** विधान ओळखा.

(1) (a) व (b) दोन्हीही (2) फक्त (b) (3) फक्त (a) (4) दोन्हीही नाहीत

---

41. बरोबरीच्या किंवा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांना किंवा मर्यादित संख्येच्या अधिकाऱ्यांना औपचारिकरित्या आदेश किंवा मंजूरी कळविण्यासाठी _________ चा वापर केला जातो.

(1) कार्यालयीन आदेश (2) परिपत्रक (3) ज्ञापन (4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**42.** मुंबईत अधिवेशन सुरु असतांना मुंबईशी संबंधित अल्पावधी सूचना प्रश्न स्वीकृत झाल्यास त्याचे उत्तर :

(1) तीस दिवसांत द्यावे लागते.
(2) चौदा दिवसांत द्यावे लागते.
(3) सात दिवसांत द्यावे लागते.
(4) तीन दिवसांत द्यावे लागते.

---

**43.** पुढीलपैकी कोणत्या बाबींसाठी टिप्पणीची आवश्यकता नसते ?

(a) क्षेत्रीय कार्यालयांकडे किंवा इतर विभागांकडे अर्ज अग्रेषित करताना.

(b) मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाबाबत शासकीय आदेश काढताना.

(c) वस्तुस्थितीवर आधारित उत्तरे असल्यास.

(d) रजा, भविष्य निर्वाह निधी, रोखपालाचे काम इत्यादी ठराविक साच्याची प्रकरणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (c) व (d)
(2) वरील सर्व
(3) केवळ (b)
(4) (a), (b) व (c)

---

**44.** आमदार, खासदार यांनी जर मंत्र्यांना पत्र लिहिले असेल तर त्याचे उत्तर ________ सहीने जाणे आवश्यक आहे.

(1) विभाग प्रमुखांच्या
(2) सचिवांच्या
(3) मंत्र्यांच्या
(4) मुख्यमंत्र्यांच्या

---

**45.** परिपत्रकाच्या सहाय्याने पुढीलपैकी कोणत्या बाबी केल्या जातात ?

(a) मार्गदर्शक तत्वे पुन्हा निदर्शनात आणून दिल्या जाणे.

(b) विभागीय व कार्यालयीन प्रमुखांकडून एखाद्या विषयावर माहिती मागविणे (मंत्रालय स्तरावरून).

(c) शासनाची औपचारिक मंजुरी कळविणे.

(d) महत्त्वाचे शासन निर्णय कळविणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b)
(2) वरील सर्व
(3) फक्त (a)
(4) (a), (c) व (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**46.** प्रस्तावाशी अन्य कार्यासनांचादेखील संबंध असल्यास प्रथम :

(1) संदर्भ संबंधित कार्यासनाकडे/अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात यावा

(2) संबंधित अधिकाऱ्याशी अनौपचारिक चर्चा करावी

(3) पत्राद्वारे/टिप्पणीद्वारे माहिती मागविण्यात यावी

(4) संदर्भ दप्तरी दाखल करण्यात यावा

---

**47.** कार्यासन अधिकारी पद्धत केंव्हापासून सुरु करण्यात आली ?

(1) जुलै 1975 (2) जुलै 1971 (3) जुलै 1989 (4) जुलै 1991

---

**48.** अधिसूचनेबाबत पुढीलपैकी कोणती विधाने खरी आहेत ?

(a) राजपत्रिंत अधिकाऱ्यांच्या नेमणूका, रजा, बदल्या इत्यादींसाठी सुद्धा अधिसूचना काढतात.

(b) अधिसूचना विधी व न्याय विभागाला दाखवून काढणे जरूरीचे आहे.

(c) असाधारण राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करावयाची असल्यास उपसचिव किंवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची संमती घेणे आवश्यक नसते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने खरी आहेत (2) केवळ (c)

(3) (a) व (c) (4) (a) व (b)

---

**49.** (a) प्रारूप मान्य होईल अशी शक्यता असल्यास टंकलिखित व स्थळ प्रत एकदमच सादर करावी.

(b) प्रारूप सादर करताना टिप्पणीची आवश्यकता असतेच असे नाही.

उपरोक्त विधानांसाठी खालीलपैकी **योग्य** पर्याय निवडा.

(1) वरील दोन्ही विधाने असत्य आहेत (2) फक्त (a) सत्य

(3) फक्त (b) सत्य (4) (a) व (b) दोन्हीही विधाने सत्य आहेत

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

50. टिप्पणी लेखनाचे खालीलपैकी कोणते हेतू आहेत ?

(a) नस्ती तयार करणे.

(b) पत्र किंवा प्रकरण प्रलंबित ठेवणे.

(c) संबंधित नियम व पूर्वीचे निर्णय यांच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही सुचविणे.

(d) शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या मागील कारणमीमांसा, विचारात घेतलेले मुद्दे, नियम या सर्वांचा कायमस्वरुपी अभिलेख कागदपत्रात ठेवणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (c), (d) (2) (a), (c) व (d)

(3) (a), (b), (c) व (d) (4) फक्त (d)

---

51. खालील शब्दातील शुद्ध शब्द ओळखा :

(1) संगितीका (2) संगीतिका (3) संगीतीका (4) संगितिका

---

52. दु:खी जगा देखुनिया द्रवे ते

सच्चित्त माते नवनीत वाटे

अन्याय कोठे दिसता परी ते

त्या इंद्रवज्रासही लाजवीते

वरील काव्यपंक्तीतील अक्षरगणवृत्त ओळखा :

(1) इंद्रवज्रा (2) मालिनी (3) पृथ्वी (4) मंदारमाला

---

53. कोणत्या संधीमध्ये जवळ जवळचे दोन स्वर एकत्र मिसळतात ?

(1) स्वर (2) व्यंजन (3) विसर्ग (4) स्वरादी

---

54. 'कृपाहीन' शब्दाचा समास :

(1) कर्मधारय (2) तत्पुरुष (3) अव्ययीभाव (4) द्वंद्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

55. जे चकाकते ते सोने नसते -

(a) वरील वाक्यातील जे चकाकते हे एक केवल वाक्य आहे.

(b) वरील वाक्यातील ते सोने नसते हे दुसरे केवल वाक्य आहे.

(c) वरील वाक्यातील जे चकाकते हे अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र वाक्य नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर (4) (a), (b), (c) बरोबर

---

56. संस्कृतातून मराठीत आलेल्या नामांची स्त्रीलिंगी रूपे ई-प्रत्यय लागून होतात यानुसार कोणते उदाहरण बरोबर आहे ?

(1) बाप-आई (2) श्रीमान-श्रीमती (3) खडा-खडी (4) घोडा-घोडी

---

57. हळू हळू, घर घर, कोणी कोणी हे शब्द कोणत्या प्रकारात मोडतात ?

(1) सामाजिक (2) अभ्यस्त शब्द (3) प्रत्यय घटित (4) उपसर्ग घटित

---

58. "ओनामा" या शब्दाचा खालीलपैकी अर्थ कोणता ?

(1) दुटप्पी धोरण (2) खूप मार देणे

(3) एखाद्या गोष्टीची सुरुवात करणे (4) अगदी लहान असणे

---

59. 'सर्व नागरिकांनी वेळच्या वेळी कर भरावे' - या विधानाचा अर्थप्रकार कोणता ?

(1) स्वार्थ (2) विध्यर्थ (3) परार्थ (4) परमार्थ

---

60. 'तो बहुधा घरी असावा' - अर्थाचा प्रकार ओळखा.

(1) विध्यर्थ (2) संकेतार्थ (3) स्वार्थ (4) आज्ञार्थ

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

61. 'व्यतिरेक' अलंकाराची पुढीलपैकी विशेष बाब कोणती ?

(1) कोणतीही कल्पना फुगवून सांगितली जाते.

(2) उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन केलेले असते.

(3) दोन वस्तूंतील साम्याचे वर्णन केले जाते.

(4) दुसऱ्याला उद्देशून केलेली उक्ती.

---

62. बोलता बोलता विचारमालिका तुटल्यास ________ चिन्ह वापरतात.

(1) संयोग (2) अपसारण (3) अवतरण (4) प्रश्न

---

63. मुळ शब्दांच्या किंवा धातूच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही साधित शब्द बनवितात या अक्षरांना ________ असे म्हणतात.

(1) उपसर्ग (2) साधित (3) प्रत्यय (4) तद्भव

---

64. (i) त्याला गणितात पैकीच्या पैकी गुण मिळाले.

(ii) त्याला गणितात शंभरपैकी शंभर गुण मिळाले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान नं. (i) बरोबर आहे (2) विधान नं. (ii) बरोबर आहे

(3) दोन्ही विधाने चूक आहेत (4) दोन्ही विधाने बरोबर आहेत

---

65. स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय असलेले वाक्य ओळखा :

(1) अभ्यास केला तर यशस्वी होता येते. (2) तो म्हणाला, की मी हरलो.

(3) अभ्यास केला म्हणून यश मिळाले. (4) त्याला यश मिळाले कारण त्याने अभ्यास केला.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

66. ती स्त्री ढाल गजभवानी आहे या वाक्यातील 'ढाल गजभवानी' या शब्दाचा अर्थ खालीलपैकी कोणता ?

(1) लठ्ठ स्त्री
(2) निर्लज्ज किंवा अचाट कृत्य करणारी मुर्ख स्त्री
(3) अघळ पघळ वागणारी
(4) क्रोधी स्त्री

---

67. ________ हे इतरेतर द्वंद्व समासाचे उदाहरण नाही.

(1) भीमार्जुन (2) टिळाटोपी (3) सीतासावित्री (4) स्त्रीपुरुष

---

68. पुढीलपैकी ________ हा शब्द कानडी नाही.

(1) गाडगे (2) पिशवी (3) शेवया (4) काडतूस

---

69. अव्ययसाधित विशेषण प्रकार ओळखा :

(1) वरचा मजला (2) अर्धा तास (3) सातारी पेढे (4) पिकलेला आंबा

---

70. शब्दाच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून तयार होणाऱ्या अक्षरांना ________ म्हणतात.

(1) प्रत्यय (2) तत्सम (3) तद्भव (4) देशी

---

71. ________ हा शब्द कानडीमधून आलेला आहे.

(1) बांगडी (2) फालतू (3) पगार (4) पाव

---

72. ________ याला अरबी उपसर्ग लागला आहे.

(1) बिनतारी (2) पडताळा (3) निनावी (4) सुजाण

---

73. जा, ये, कर, बस, बोल, पी यासारखे मुळ धातू किंवा शब्द भाषेत असतात त्यांना ________ शब्द म्हणतात.

(1) साधित (2) सिद्ध (3) तत्सम (4) देशी

---

कच्च्या कामासाठी जागा



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

74. आज्ञार्थ व्यक्त करणारे वाक्य कोणते ?

(1) 'मी घरी जाऊ ?' (2) सर्वांनी खरे असले ते सांगावे

(3) मुलांनी गुरुची आज्ञा मानावी (4) चाकर आज गावावरुन परत यावा

---

75. 'सोलणे' या क्रियापदाचा संयुक्त क्रियापद म्हणून कसा वापर होतो ?

(1) चंदू शेंगा सोलीत होता (2) चंदूने शेंगा सोलल्या

(3) चंदू शेंगा सोलेल (4) यापैकी एकही नाही

---

76. शब्दांच्या एकूण ________ जाती आहेत.

(1) नऊ (2) आठ (3) सात (4) सहा

---

77. पुढील काव्यपंक्तीत ________ अलंकाराचा वापर केला आहे.

अफाट आकाश, हिरवी धरती

पुनवेची रात सागर भरती

(1) व्यतिरेक (2) रूपक (3) उपमा (4) यमक

---

78. 'कर' या धातुचे पुल्लिंगी द्वितीय पुरुषी अनेकवचनी संकेतार्थाचे रूप :

(1) करता (2) करतो (3) करते (4) करतास

---

79. पुढीलपैकी ________ हे क्रियापद विशेषण साधित आहे.

(1) पिसाटणे (2) भुकेजणे (3) खुणावणे (4) सुरकुतणे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

80. 'भेदभाव दाखविणे' या अर्थासाठी खालीलपैकी वाक्प्रचार कोणता ?

(1) पंक्तिप्रपंच करणे (2) पडदा करणे (3) पगडी फिरवणे (4) पांढऱ्यावर काळे येणे

81. इकडून, तिकडून, दुरुन, लांबून ही उदाहरणे कोणत्या क्रियाविशेषण अव्ययाची आहेत ?

(1) गतिदर्शक (2) स्थितीदर्शक (3) कालवाचक (4) सातत्यदर्शक

82. _________ हा शुद्ध शब्द आहे.

(1) म्युनिसिपालीटी (2) म्यूनिसीपालीटी (3) म्यून्सीपाल्टी (4) म्युनिसिपालिटी

83. खालील समूहातील 'अयोग्य' सामासिक शब्द ओळखा :

(1) पंचवटी (2) नवरात्र (3) त्रिभुवन (4) नीलकंठ

84. ''भक्तीने वाहिलेली फुले - मग ती कोणतीही असोत - देवाला प्रियच वाटतात''. या वाक्यात कोणते विरामचिन्हे वापरले आहे ?

(1) अवतरण, अपसरण, पूर्णविराम (2) फक्त पूर्ण विराम

(3) अवतरण, पूर्णविराम (4) अपसरण, पूर्णविराम

85. खालील शुद्ध शब्द ओळखा :

(1) अंतर्नीदिष्ट (2) अंतर्निदिष्ट (3) अंतर्निदीष्ट (4) अंत:नीर्दीष्ट

86. ने, ए, शी हे कोणत्या विभक्ती प्रत्ययाचे प्रत्यय आहेत ?

(1) द्वीतीया (2) प्रथमा (3) चतुर्थी (4) तृतीया

कच्च्या कामासाठी जागा



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

87. पुढील शब्द कोणत्या शब्द जाती मधील आहे ?

छे छे

(1) विशेषण (2) केवलप्रयोगी अव्यय (3) शब्दयोगी अव्यय (4) उभयान्वयी अव्यय

88. (i) गोगलगाय फार हळू चालते.

(ii) तो फार अशक्त मुलगा आहे.

(a) विधान नं. (i) क्रियाविशेषण अव्ययाचे नाही. (b) विधान नं. (ii) विशेषणाचे आहे.

(c) विधान नं. (i) विशेषणाचे आहे. (d) विधान नं. (ii) क्रियाविशेषण अव्ययाचे आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

89. पुढील शब्द फार्सीतून आलेला नाही :

(1) तराजू (2) दुभाषी (3) इनाम (4) मजुरी

90. ङ, ञं, ण, न, म यांना _________ वर्ण म्हणतात.

(1) स्वरादी (2) अनुनासिक (3) व्यंजने (4) स्वर

91. पुढीलपैकी प्रत्ययघटित शब्द ओळखा :

(1) पराजय (2) सुग्रास (3) संस्कार (4) कर्तव्य

92. आहार, विहार, संहार, प्रहार हे शब्द खालीलपैकी कोणत्या प्रकारात मोडतात ?

(1) प्रत्यय घटित (2) उपसर्ग घटित (3) सिद्ध (4) साधित

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

93. पुढील वाक्यातील 'प्रयोग' ओळखा :

मघाशीच उजाडले

(1) कर्मणी प्रयोग (2) भावे प्रयोग (3) संकरित प्रयोग (4) कर्तरी प्रयोग

---

94. 'आंबट ओला' म्हणजे :

(1) चिंचेचे पाणी घालून ओला (2) अर्धवट वाळलेला

(3) आंबट वास येणारा ओला (4) ओला चिंब

---

95. 'घुसळतीपेक्षा उकळतीचे अधिक' या म्हणीचा योग्य वापर :

(1) रामरावांकडे ताक भरपूर कारण घुसळतीपेक्षा उकळतीचे अधिक

(2) व्याजाचा धंदा करणारा शिरीष दरवर्षी सहलींना जातो पण नोकरदार अक्षयला मात्र कधीतरीच जाता येते, म्हणतात ना घुसळतीपेक्षा उकळतीचे अधिक

(3) पर्याय क्र. (1) आणि (2)

(4) वरीलपैकी एकही नाही

---

96. 'मी मैदानावर जाईन' हे वाक्य ________ आहे.

(1) स्वार्थी (2) आज्ञार्थी (3) संकेतार्थी (4) विध्यर्थी

---

97. चतुर्थी तत्पुरुष समासाचे उदाहरण :

(1) क्रीडांगण (2) जातीभ्रष्ट (3) पदच्युत (4) बंधमुक्त

---

98. मूलध्वनीच्या यादीला पुढीलपैकी काय म्हणतात ?

(1) वर्ण (2) वर्णमाला (3) लिपी (4) दृश्यचिन्हे

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

99. ________ हा सिद्ध धातू नाही.

(1) हाताळणे (2) करणे (3) बोलणे (4) चालणे

100. 'सर्व साधने अनुकूल असता त्याचा फायदा करून घ्यावा' असा अर्थ व्यक्त करणारी म्हण :

(1) वाहत्या गंगेत हात धुवून घ्यावा (2) वाकड्या बोटाशिवाय तूप निघत नाही

(3) वारा पाहून पाठ द्यावी (4) यापैकी एकही नाही

101. ________ हे नामसाधित क्रियापद आहे.

(1) डोकावणे (2) पुढारणे (3) खालावणे (4) दुरावणे

102. पुढील चार शब्दांपैकी शुद्ध शब्द शोधा.

(1) कोट्यावधी (2) कोट्यवधी (3) कोट्यअवधी (4) कोट्याआवधी

103. कव्वाली हा शब्द कोणता परभाषीय शब्द आहे?

(1) अरबी (2) पोर्तुगीज (3) हिंदी (4) कानडी

104. पुढीलपैकी 'इतरेतर द्वंद्व' समास कोणता?

(1) हरिहर (2) पास नापास (3) पालापाचोळा (4) पीतांबर

105. कोणत्या पर्यायात दर्शक सर्वनाम वापरले आहे?

(1) तो चांगला मुलगा आहे (2) ती रात्र कसोटीची होती

(3) त्या सर्व वस्तू चोरीच्या होत्या (4) वरील सर्व वाक्यात

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

106. पुढील वाक्यातील 'प्रयोग' ओळखा :

आम्ही तुला फार सतावले

(1) कर्तरी (2) कर्मणी (3) संकर (4) भावे

107. एका फूलाहून एक गुच्छ चांगला या वाक्यातील विभक्ती प्रत्ययाचे उदाहरण कोणत्या विभक्ती प्रत्ययाचे आहे ?

(1) चतुर्थी (2) पंचमी (3) षष्ठी (4) प्रथमा

108. खालील विधानात कोणत्या प्रकारचे क्रियापद आले आहे ?

**विधान** : आजीने नातीला गोष्ट सांगितली.

(1) संयुक्त क्रियापद (2) द्विकर्मक क्रियापद (3) शक्य क्रियापद (4) नवे क्रियापद

109. कोशिंबीर हा ________ भाषेतील शब्द आहे.

(1) तद्भव (2) देशी (3) कानडी (4) फार्सी

110. तो न चुकता येतो हे कोणत्या क्रियाविशेषण अव्ययाचे उदाहरण आहे ?

(1) निषेधार्थक (2) प्रश्नार्थक (3) रितीवाचक (4) संख्यावाचक

111. पुढीलपैकी अनेकवचन सप्तमीचा प्रत्यय कोणता ?

(1) दारीं (2) दारांचा (3) दारास (4) दाराला

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

112. "दिव्याखाली अंधार" या वाक्याच्या आधारे खालील उत्तरे द्या.

(a) खाली हा शब्द शब्दयोगी अव्यय आहे.
(b) खाली हा शब्द शब्दयोगी अव्यय नाही.
(c) खाली हा शब्द क्रियाविशेषण अव्यय आहे.
(d) खाली हा शब्द क्रियाविशेषण अव्यय नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) बरोबर
(2) फक्त (a) बरोबर
(3) फक्त (c) बरोबर
(4) फक्त (d) बरोबर

---

113. कर्ता तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो ही कोणत्या प्रयोगाची लक्षणे आहेत ?

(1) भावे प्रयोग
(2) नवीन कर्मणी
(3) मिश्र प्रयोग
(4) कर्तरी प्रयोग

---

114. वाचन + आलय = वाचनालय

विद्या + अर्जन = विद्यार्जन

ही उदाहरणे कोणत्या संधीची आहेत ?

(1) व्यंजन संधी
(2) स्वर संधी
(3) विसर्ग संधी
(4) स्वरादी

---

115. खालील शुद्ध शब्द ओळखा.

(1) बुद्धि वैभव
(2) बूद्धि वैभव
(3) बुद्धी वैभव
(4) यापैकी नाही

---

116. 'शिक्षकांनी कविता छान शिकवली' हे वाक्य कोणत्या प्रयोगाचे उदाहरण आहे ?

(1) कर्मणी प्रयोग
(2) कर्तरी प्रयोग
(3) भावे प्रयोग
(4) भिन्नलिंगी कर्म

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

117. पुढीलपैकी बरोबर जोडी कोणती ?

(a) अकरावा रूद्र – अतिशय तापट माणूस (b) अकलेचा कांदा – हुशार माणूस

(c) अजागळ – कामाचा (d) अडणीवरचा शंख – चांगला माणूस

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) बरोबर (2) फक्त (a) बरोबर (3) फक्त (c) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

---

118. 'सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो।

कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो।' या काव्य ओळीतील अलंकार ओळखा :

(1) रूपक (2) अनुप्रास (3) श्लेष (4) यमक

---

119. पुढीलपैकी द्विगू समास ओळखा :

(1) पंचवटी (2) घननीळ (3) पुरणपोळी (4) पापपुण्य

---

120. 'तू खाली ये' या वाक्यातील अधोरेखित शद्बाची जात ________ आहे.

(1) क्रियाविशेषण अव्यय (2) शद्बयोगी अव्यय

(3) विशेषण (4) पर्याय क्र. (1) आणि (2)

---

121. भिंत खचली, कलथून खांब गेला

जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाळा

तिच्या कौलारी बसून पारवा तो

खिन्न, निरस, एकांतगीत गातो.

या काव्यपंक्तीचा अलंकार कोणता ?

(1) अर्थांतरन्यास (2) अन्योक्ती (3) पर्यायोक्त (4) स्वभावोक्ती

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**122.** 'तानाजी शौर्याने लढला' वाक्याचा काळ ओळखा :

(1) साधा भूतकाळ (2) अपूर्ण भूतकाळ (3) पूर्ण भूतकाळ (4) क्रीडा भूतकाळ

---

**123.** खालील विधानातील सर्वनामाचा प्रकार ओळखा :

**विधान** : तो आपण होऊन माझ्याकडे आला.

(1) सामान्य सर्वनाम (2) आत्मवाचक सर्वनाम

(3) दर्शक सर्वनाम (4) संबंधी सर्वनाम

---

**124.** 'मातृभूमीचा उद्धार करता यावा यास्तव मी गुणसुमने वेचिली' या वाक्यातील उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा.

(1) संकेत बोधक (2) कारण बोधक (3) उद्देश बोधक (4) विकल्प बोधक

---

**125.** खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा :

(1) विधीपूर्वक (2) विधिपूर्वक (3) वीधीपूर्वक (4) विधिपुर्वक

---

**126.** जेव्हा संधी होणाऱ्या वर्णातील पहिला वर्ण व्यंजन असतो व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असतो, तेव्हा त्या संधीस ________ म्हणतात.

(1) स्वर (2) विसर्ग (3) व्यंजन (4) स्वरादी

---

**127.** 'गावापासून' या शब्दातील प्रत्यय ________ चा आहे.

(1) एकवचन चतुर्थी (2) एकवचन पंचमी (3) अनेकवचन संबोधन (4) अनेकवचन सप्तमी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**128.** (i) जगी सर्वसुखी असा कोण आहे ?

(ii) जगात सर्व सुखी असा कोणी नाही.

(a) विधान नं. (i) प्रश्नार्थी आहे

(b) विधान नं. (ii) विधानार्थी आहे

(c) विधान नं. (ii) नकारार्थी आहे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) बरोबर (2) (a), (c) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (c) बरोबर

---

**129.** (a) अभिनंदन हा शब्द उपसर्ग घटित शब्द आहे.

(b) श्रवणीय हा शब्द उपसर्ग घटित शब्द आहे.

(c) लेखक हा शब्द प्रत्यय घटित शब्द आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर

(2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (a), (c) बरोबर

(4) फक्त (c) चूक

---

**130.** 'मुले झोपली असतील' – या वाक्याचा काळ कोणता ?

(1) रीति भविष्यकाळ (2) पूर्ण भविष्यकाळ

(3) अपूर्ण भविष्यकाळ (4) साधा भूतकाळ

---

**131.** कोणत्या प्रयोगात कर्म नेहमी नपुसकलिंगी एकवचनी व तृतीयपुरुषी असते ?

(1) कर्मणी प्रयोग (2) भावे प्रयोग (3) कर्तरी प्रयोग (4) कर्ता

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**132.** कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्याशीच थांबत असेल किंवा कर्त्याच्या ठिकाणी लय पावत असेल तर ते क्रियापद __________ असते.

(1) द्विकर्मक (2) भावकर्तृक (3) संयुक्त (4) अकर्मक

---

**133.** गडद निळे गडद निळे

जलद भरुनि आले,

शितल तनु चपल चरण

अनिलगण निघाले.

हे कशाचे उदाहरण आहे ?

(1) रूपक (2) उत्प्रेक्षा (3) अनुप्रास (4) यमक

---

**134.** पुढीलपैकी देशी शब्द :

(1) चाफा (2) उतरंड (3) सात (4) माग

---

**135.** पुढील काव्यपंक्तीत कोणता अलंकार आहे ?

तुजसाठी मरण ते जनन

तुजवीण जनन ते मरण

तुज सकल चराचर शरण

(1) विरोधाभास (2) सार

(3) अन्योक्ती (4) वरीलपैकी एकही नाही

---

**136.** 'प्रदेशवर्णनशास्त्र' यासाठी इंग्रजीत __________ हा पारिभाषिक शब्द वापरतात.

(1) Topography (2) Geology (3) Geography (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

137. खालीलपैकी शुद्धलेखना नुसार कोणता शब्द बरोबर आहे ?

(1) अभीषिक्त (2) अभीषीक्त (3) अभिषिक्त (4) अभिषीक्त

138. 'मुले अभ्यास करतात' – अर्थाचा प्रकार ओळखा.

(1) स्वार्थ (2) आज्ञार्थ (3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

139. __________ हा अर्थालंकार नाही.

(1) उपमा (2) उत्प्रेक्षा (3) रूपक (4) यमक

140. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द ओळखा :

आजन्म, यथाशक्ती, दारोदार, देवदूत

(1) आजन्म (2) यथाशक्ती (3) दारोदार (4) देवदूत

141. अकारांत शब्दाचे उपान्त्य इकार दीर्घ लिहावे, या नियमाचा अपवाद :

(1) दिन (2) विष (3) कृत्रिम (4) वरील सर्व

142. अनुस्वार व विसर्ग यांचा उच्चार करतांना आधी स्वर यावा लागतो म्हणून यांना __________ असे म्हणतात.

(1) स्वर (2) स्वरादी (3) अनुस्वार (4) व्यंजन

143. ज्यांच्या विषयी आपण बोलतो किंवा लिहितो त्या व्यक्तींचा व वस्तुंचा व्याकरणात यांना __________ असे म्हणतात.

(1) दर्शक सर्वनाम (2) पुरुषवाचक सर्वनाम (3) प्रश्नार्थक सर्वनाम (4) आत्मवाचक सर्वनाम

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**144.** खालीलपैकी मराठी प्रत्यय लागून तयार झालेली शब्दसाधिते ओळखा :

(1) कायिक (2) शिलाई (3) आनंदित (4) कुलीन

---

**145.** तिकडे कोण आहे, ते मला माहित नाही हे कोणत्या प्रकारच्या सर्वनामाचे उदाहरण आहे ?

(1) संबंधी (2) सामान्य (3) प्रश्नार्थक (4) दर्शक

---

**146.** खालील पर्यायांपैकी 'केवल वाक्य' ओळखा :

(1) आम्ही जातो आमुच्या गावा.

(2) हुशार मुले अभ्यास करतात पण इतर मुले खेळत बसतात.

(3) मनस्वी अभ्यास करून पहिला आलेला मुलगा तो हाच आहे.

(4) तुम्ही प्रयत्न केले असते, तर यश मिळाले असते !

---

**147.** (i) अंजीर, बगीचा हे शब्द फारसी भाषेतील आहेत.

(ii) अर्ज, उर्फ हे शब्द अरबी भाषेतील आहेत.

(iii) पेन, पेन्सील हे शब्द कानडी भाषेतील आहेत.

(iv) भाकरी, तूप हे शब्द इंग्रजी भाषेतील आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान नं. (i) चूक आहे (2) विधान नं. (ii) चूक आहे

(3) विधान नं. (i) व (ii) बरोबर आहेत (4) विधान नं. (iii) व (iv) बरोबर आहेत

---

**148.** __________ हा अकर्मक धातू नाही.

(1) उठणे (2) बसणे (3) वाचणे (4) निजणे

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

149. 'मी लेख लिहिला असेल' - या वाक्याचा काळ कोणता ?

(1) साधा भविष्यकाळ (2) अपूर्ण भविष्यकाळ (3) रीति भविष्यकाळ (4) पूर्ण भविष्यकाळ

---

150. तसाच पुनः पुनः न येता एखादे अक्षर बदलून येते त्या शब्दास ________ म्हणतात.

(1) अंशाभ्यस्त शब्द (2) पूर्णाभ्यस्त शब्द (3) अनुकरण वाचक (4) उपसर्ग घटित

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial